सकाळ कोल्हापूर
शुक्रवार, ३ फेब्रुवारी २०२३
TODAY

## भूषण पोटे, अनिकेत जोंधळेची सायकलिंगसाठी निवड



भूषण पोटे



अनिकेत जोंधळे

गडहिंग्लज : औरंगाबादला १४ ते १७ फेब्रुवारीअखेर होणाऱ्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ सायकलिंग स्पर्धेसाठी येथील ओंकार कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील सायकलपटू भूषण पोटे व अनिकेत जोंधळे यांची निवड झाली आहे. जतमध्ये झालेल्या आंतरविभागीय सायकलिंग स्पर्धेत भूषण व अनिकेतने अनुक्रमे पाचवा व सहावा क्रमांक पटकावला होता. संस्थाध्यक्ष राजन पेडणेकर, प्र. प्राचार्य डॉ. सुरेश चव्हाण, कविता पोळ, प्रकाश कांबळे यांचे प्रोत्साहन मिळाले. क्रीडा शिक्षक सुरेश धुरे यांचे मार्गदर्शन मिळाले.